दै. पुण्यनगरी दि. 14.02.2022

दै. पुण्यनगरी दि. 14/02/2022

# देगलूरच्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार



**देगलूर /प्रतिनिधी**

वाटमारीच्या प्रकरणातील आरोपीना केवळ दोन ते अडीच तासात ३२ किमी पाठलाग करून जेरबंद करणाऱ्या देगलूर पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना जिल्हा पोलीस प्रमुखांनी प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले. पोलिस निरीक्षक सोहन माच्छरे, पोलीस उपनिरीक्षक बसवराज जाकिकोरे, करडखेड बीट जमादार माधव पल्लेवाड यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक कमलाकर गड्डिमे, पोलिस उपनिरीक्षक रविकुमार मुंडे,पोलिस कॉन्स्टेबल सुनील पत्रे, चालक मिर्झा अहमद बेग रामतीर्थ पोलिस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय जाधव, पोना. रशिदखाँन पठाण, पोअ. अनिल रिंदकवाले यांनी ही कामगिरी केली होती.

करडखेड येथील एका देशीदारू दुकानाचा व्यवस्थापक नित्यनेमाने जमा रक्कम घेऊन आपल्या दुचाकीवरून रात्री नऊ ते साडेनऊ च्या सुमारास देगलूरकडे परतत असे. ही माहिती गुन्हेगारी वर्तुळात शिरकाव करणाऱ्या स्थानिक व्यक्तींकडून नांदेडच्या दोघांना समजली. त्या तिघांनी १२ जानेवारी रोजी रात्री नऊ वाजता देगलूरकडे दुचाकीवर निघालेल्या व्यवस्थापकास कावळगाव -चाकूर फाटा या रस्त्यावर गाठून शस्त्रास्त्र दाखवून त्याच्याजवळील ६२ हजार ८१० ची रक्कम हिसकावून घेतली. त्याच्या मोबाईलमधील सीमकार्डचे तुकडे करून फेकून दिले आणि दुचाकीवरून नांदेडकडे पलायन केले. संबंधिताने त्याच रस्त्यावरील एका ढाब्यातून पोलीस ठाण्यास झालेल्या घटनेची माहिती दिली.

यावेळी गस्तीवर असलेले पोलीस उपनिरीक्षक बसवराज जाकिकोरे यांना ही माहिती देण्यात आल्यानंतर त्यांनी प्रथम देगलूर शहरातील अण्णाभाऊ साठे चौक,शिवाजी उद्यान या परिसरात वाटमारी करणाऱ्या दुचाकीस्वारासाठी सापळा लावला. हे आरोपी येत असल्याचा संदेश दिल्यामुळे रामतीर्थ पोलिसांनी शंकरनगर रस्ता व नरसी चौकात अडथळे लावले. जाकिकोरे व त्यांच्या पथकाने त्यांचा पाठलाग केला. परंतु आरोपींनी भरधाव व आपल्या जीवाची पर्वा न करता नरसी गाठले व तेथे हे आरोपी पकडले गेले. लुबाडलेल्या रकमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले. या पथकाने दाखविलेली तत्परता पाहून नांदेड येथे दि. १२ फेब्रुवारी रोजी झालेल्या क्राईम बैठकीमध्ये जिल्हा पोलीस प्रमुख प्रमोदकुमार शेवाळे यांनी पोलिस निरीक्षक सोहन माच्छरे , सहाय्यक पोलीस निरीक्षक कमलाकर गड्डिमे, पोलिस उपनिरीक्षक बसवराज जाकीकोरे पोलिस उपनिरीक्षक रविकुमार मुंडे, जमादार माधव पल्लेवाड, पोलिस कॉन्स्टेबल सुनील पत्रे, चालक मिर्झा अहमद बेग व रामतीर्थ पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय जाधव, पोना. रशिदखाँन पठाण, अनिल रिंदकवाले यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला.

यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक निलेश मोरे,देगलूर उपविभागीय अधिकारी सचिन सांगळे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी व पोलीस निरीक्षक उपस्थित होते.

दै. गोदातीर दि 14/02/2022

दै. गोदातीर दि. 014/02/2022

# ाब्यावरील रक्कम हिसकावून चोरट्यांची धूम; पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करून चोरट्यांना पकडले

## ल्हा पोलीस अधीक्षकांनी केला कामगिरीबद्दल सन्मान



**नायगाव बाजार**–करडखेड ते देगलूर
...ान असलेल्या जयमल्हार धाब्याजवळ
... मॅनेजरजवळील रक्कम हिसकावून घेत
...डकडे पळून जाणाऱ्या तीन सशस्त्र
...रूंना रामतीर्थ पोलिसांनी नरसी
...कात मोठ्या शिताफीने फिल्मी स्टाईल

अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांनी रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विजय जाधव यांचा प्रशस्तीपत्रक देऊन गौरव केला आहे. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक निलेश मोरे, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे यांची

हाती घेतल्यानंतर सहायक पोलीस निरीक्षक विजय जाधव यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबरोबरच जनमानसात आपल्या कार्याची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांनी कमी काळात अनेक गुन्हे उघडकीस आणले आहेत.

शनिवार, दि. १२ जानेवारी रोजी तीन सशस्त्र लुटारूंनी देगलूर-करडखेड दरम्यात असलेल्या जय मल्हार धाब्या- जवळ धुमाकूळ घातला होता. देशी दारू विक्रीची रक्कम घेऊन जाणाऱ्या एका मॅनेजरला धाक दाखवत आरोपी शिवराज कंधारे, रोशन हाळदे, रामलिंग पल्लेबाड यांनी ६२ हजारांची रक्कम हिसकावून नांदेडच्या दिशेने पळ काढला होता. ही माहिती देगलूर पोलिसांना मिळताच त्यांनी रामतीर्थ पोलिसांना कळवली. पोलिसांनी तत्काळ नरसी चौकात लुटारूंना पकडण्यासाठी यंत्रणा उभी केली. चोरट्यांकडे शस्त्र न बाळगता नरसी चौकात बॅरिकेड्स लावून पूर्ण रस्ता बंद केला. रात्री दहा वाजता अतिवेगाने मोटारसायकलवर नांदेडकडे पळ काढणाऱ्या या तिन्ही आरोपींना रामतीर्थ पोलिसांनी पकडले. सहायक पोलीस निरीक्षक विजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस जमादार पठाण व पोलीस कॉन्स्टेबल अनिल रिंदकवाले, चालक हबीबभाई शेख यांनी जीवाची पर्वा न करता तिन्ही आरोपींना पकडून धाडसी कारवाई केली.

रामतीर्थ येथील पोलिसांनी केलेल्या या कौतुकास्पद कामगिरीचे जिल्हा पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांनी दखल घेत शनिवारी नांदेड येथे सहायक पोलीस निरीक्षक विजय जाधव, जमादार पठाण, पोलीस कॉन्स्टेबल अनिल रिंदकवाले यांचा प्रशस्तीपत्रक देऊन गौरव केला